साहित्य संपदा या दिवाळी अंकात तुमच्या लहान भावाची कविता प्रकाशित झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

दि. 2 नोव्हेंबर 2021

प्रिय, महेश

अनेक आशीर्वाद

महेश तुझे मनपुर्वक अभिनंदन! साहित्य संपदाच्या दिवाळी अंकात "चिमणी वाचवा" ही कविता वाचली. मला ती कविता खूप आवडली कवीचे नाव वाचले तर आमचे छोटे बंधुराज महेश यांचे नाव दिसले. मला तुझा खूप अभिमान वाटला.

महेश तू सध्या सातवीत आहेस पण तुला पक्षी जगताच्या भावना समजून घेता येतात. तुझे करावे तेवढे कौतुक कमीच आहे तुला पक्ष्यांचे निरीक्षण करायला खुप आवडते. त्यांचे तू फोटो घेतोस त्यांच्या सवयी खाणे-पीने यांच्या नोंदी ठेवतोस. हे सगळे करताना तू त्याच्या भाव विश्वा जवळ जातोस त्याचाच चांगला परिणाम तुझं म्हणजे तुझी चिमणी वाचवा ही कविता आई बाबांना तुझ्या काव्यनिर्मितीचा निश्चित अभिमान वाटला असेल भविष्यात तू विविध विषयांवर साहित्यलेखन करावे यासाठी शुभेच्छा! त्यासाठी भरपूर पुस्तके वाच. मनन कर निरीक्षण कर. मोठी बहीण म्हणून हक्काने हे सुचवते. हाच मेल मी नागपूर कोलक्त्याच्या आपल्या चुलत भावंडाना पाठवत आहे. पुन्हा एकदा अभिनंदन.

तुझी ताई

अ. ब. क

गोपाळ नगर लातूर